<u>नियमीत दिवाणी दावा क्र.२१३/२००९ मधील नि.क्र.१४७ वरील आदेश</u>

०१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादीतर्फे साक्षीदारास साक्षी समन्स काढण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, वादीने सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी असे कथन करतात की, प्रस्तुत दावा मिळकतीचे संदर्भात सदरील मिळकत ही वडूज पुसेगांव या राज्यमहामार्गामध्ये नोंदलेले असून सदर मिळकतीमध्ये म्हणजेच रस्त्यामध्ये वडूज येथील दिवाणी न्यायालयाचे पश्चिमेस लागून असलेला वरील मिळकतीमधील राज्यमहामार्ग हा कोणत्या सर्वे नंबरमधून तयार करणेत आला आहे. त्याबाबतचा नकाशा व सर्वे नंबरचा खुलासा करणेत आलेला आहे. त्याबाबतचा नकाशा व सर्वे नंबरचा खुलासा करणे कामी आवश्यक असणारे सर्व कागदपत्र घेवून साक्ष नोंदविणेकामी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वडूज (पेडगांव रोड) यांना साक्षी समंस काढणेत यावेत. त्या संदर्भीय कागदपत्र दाखल करणेसाठी व साक्ष देणेसाठी माहितगार इसम यांना न्यायालयात नेमलेल्या तारखेस हजर राहणेसाठी साक्षी समंस काढणेत यावे, अशी प्रतिवादीने विनंती केली आहे.

०२. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास सक्त हरकत नोंदविली आहे. वादी याचे असे म्हणणे आहे की, प्रस्तुतचा अर्ज हा खोटा आहे. सदर कामी प्रतिवादी यांचे साक्षीदार क्र. २ यांनी त्यांचे उलट तपासामध्ये मिळकत कुठे आहे याचा उल्लेख केला आहे. सदर साक्षीदार यांचे साक्षीचा वादतथ्याशी काही संबंध नाही. करीता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा, अशी वादीने विनंती केली आहे.

०३. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०४. प्रस्तुत दाव्याच्या अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले असता असे सरळ-सरळ दिसून येते की, प्रस्तुत दावा वादीने निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. माझ्या मते, वादी व प्रतिवादी यांचेमधील प्रलंबित असलेल्या वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी प्रतिवादी यांचा प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल. प्रस्तुत अर्ज नामंजूर केला तर प्रतिवादी यांना त्यांची बाजू सिध्द करण्याची संधी मिळणार नाही. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास दाव्याची गुंतागुंत वाढेल. प्रस्तुत प्रकरणातील दोन्ही पक्षांमधील वाद समुळ निकाली काढण्यासाठी प्रस्तुत अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास वादीस प्रतिवादीच्या साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची संधी मिळणार आहे व उलटतपास दरम्यान वादीस प्रतिवादीच्या साक्षीदाराची सत्यता तपासण्याची संधी प्राप्त होणार आहे. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने अर्जात नमूद केलेल्या साक्षीदारास साक्षी समन्स काढण्यात यावे.

३. प्रतिवादी याने नियमाप्रमाणे साक्षीदार यांचा भत्ता भरावा.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2026.01.09 15:00:02 +0530

दि.०८.०१.२०२६. (सलीम पी. सैय्यद )

२रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, वडूज.